महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

**क्र.३७४(२)/२०१९/१४-ब** **दिनांक- १३ नोव्हेंबर, २०२०**

# घोषणा

**विषय:-** महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०१९ च्या मुलाखतीसाठींची कार्यपध्दती.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०१९ या परीक्षेतून मुलाखतीस अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची मोठी संख्या लक्षात घेता ह्या उमेदवारांच्या मुलाखती उमेदवारांचे लहान गट बनवून (जास्तीत जास्त १० उमेदवार) ‘ गट चर्चा ’ (Group Discussion) आयोजित करुन या पद्धतीद्वारे घेण्याबाबत आयोगाने योजिले आहे.

**२.** गटचर्चेचे स्वरुप खालीलप्रमाणे असेल.

२.१ गटचर्चेद्वारे मुलाखतीकरिता १० उमेदवारांचा एक गट तयार करण्यात येईल.

२.२ प्रत्येक गटास चर्चेकरिता १ तासाचा अवधी देण्यात येईल.

२.३ प्रत्येक उमेदवारास चर्चेकरिता ५ मिनिटांचा व पूर्णत्वासाठी वाढीव १ मिनिटांचा असा एकूण ६ मिनिटांचा अवधी देण्यात येईल.

२.४ गटचर्चा सुरु होण्याच्या १५ मिनिटे आधी विषयाची तयारी करण्याचे दृष्टीने गटनिहाय विषय जाहीर केला जाईल.

**३.** त्यानुषंगाने गटचर्चेद्वारे मुलाखती घेण्यासंदर्भातील सविस्तर नियम तसेच गट चर्चेचा केंद्रनिहाय कार्यक्रम लवकरच आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**ठिकाण- मुंबई**

**उपसचिव, परीक्षा-२**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**